# महाविद्यालय विकास समिती सहविचार सभा इतिवृत्त

## दिनांक - 26/4/2025

शनिवार दिनांक 26/04/2025 रोजी सकाळी 11.30 वाजता महाविद्यालय विकास समितीची सहविचार सभा मा. अध्यक्ष डॉ. विजय नारखेडे, सहसंचालक, उच्चशिक्षण, कोकण विभाग, पनवेल यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. सदर सहविचार सभेसाठी माननीय सचिव महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम तसेच अमरदीप बालविकास फाउंडेशनचे अध्यक्ष मा. एन. डी खान, प्राध्यापक संदीप वाघ व सर्व प्राध्यापक उपस्थित होते. डॉ. उज्वला डोणे समिती समन्वयक यांनी मा. सचिव डॉ. रमा भोसले मॅडम तसेच उपस्थित सर्व सन्माननीय सदस्य व प्राध्यापक यांचे सदर सहविचार सभेमध्ये हार्दिक स्वागत केले.

1) मागील सभेचे इतिवृत्त वाचन करणे : - समिती समन्वयक डॉ. डोणे यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचले व सर्वांच्या अनुमतीने ते कायम करण्यात आले.

2) वर्षभरातील महाविद्यालय विकास समितीच्या कार्याचा आढावा घेणे :- सदर सहविचार सभा ही शैक्षणिक वर्ष 2024 -25 मधील शेवटची म्हणजे चौथी सहविचार सभा असल्यानचे माननीय प्राचार्यांनी सूचित केले. डॉ. डोणे यांनी गेल्या तीन सभेमधील कार्याचा आढावा घेतला. यामध्ये शैक्षणिक वर्ष 2024-25 मधील नियोजित सेल्फ स्टडी कोर्स व व्हॅल्यू ॲडेड कोर्स पूर्तता, AISHE माहिती ऑनलाईन भरण्यात आली व PAR प्रस्ताव पूर्ण करून NCTE ला सादर करण्यात आला. 23 डिसेंबर 2024 रोजी Total Quality Management, ICSSR Funded National seminar on Sustainable development through environment: Challenges and opportunities यशस्वीपणे पूर्ण केल्याचे सांगितले वाचन संकल्प महाराष्ट्राचा, दिव्यांग शिक्षकांचा सत्कार सोहळा इत्यादी कार्यक्रम पूर्ण झाल्याचे सांगितले. अपूर्ण राहिलेल्या पण महाविद्यालय सतत पाठपुरावा करत असलेल्या वसतिगृह नूतनीकरणाचे कार्य, uplifting योजनेअंतर्गत महाविद्यालयाला मंजूर झालेल्या दोन कोटी 81 लाख रकमेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करणे याबाबत समिती सदस्यांमध्ये सविस्तर चर्चा झाली. व पुन्हा PWD कडे पाठपुरावा करण्याचे सांगितले.

3) वसतीगृह नूतनीकरण कार्याचा आढावा :- याबाबत महाविद्यालय सतत पत्र पाठवून पाठपुरावा करत असल्याचे माननीय प्राचार्यांनी सुचित केले महाविद्यालयातील प्रवेश हे वसतिगृहावर अवलंबून असतात आणि सध्या वसतिगृहाच्या इमारतीमध्ये मूलभूत सोयी सुविधांचा अभाव असल्याने दूर राहत असलेल्या विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याचे मा. प्राचार्यांनी सुचित केले.

4) महाविद्यालयास प्राप्त झालेल्या 2 कोटी 81 लाख रकमेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करणे:- महाविद्यालयाचे नूतनीकरण करणे अत्यंत गरजेचे असून मंजूर निधीसाठी प्रतिसाद मिळत नसल्याचे मा. प्राचार्यांनी सुचित केले. त्यावेळी महाराष्ट्र लोक कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष मा. एन. डी. खान सर यांनी वरिष्ठ

पातळीवर आपण प्रत्यक्ष भेट घेऊन थर्ड पार्टी म्हणून महाराष्ट्र लोककल्याणकारी संस्थेमार्फत पत्रव्यवहार करून सदर नूतनीकरणासाठी निधी मिळवण्याचा प्रयत्न करू याविषयी मत व्यक्त केले. महाविद्यालयाशी निगडित ज्या संस्था आहेत व ज्यांच्याशी MOU आहेत त्यांच्यामार्फत निधी मिळवण्यासाठी व इतर समस्या सोडवण्यासाठी निश्चितपणे पाठपुरावा करू याबाबत समिती सदस्यांमध्ये चर्चा झाली. महाविद्यालाय्च्या समस्या सोडवण्यासाठी सदर प्रयत्न आवश्यक असल्याचे मत मा. श्री. एन. डी. खान सर यांनी व्यक्त केले. याबाबत मा. प्राचार्यांनी सर्वांनी मिळून निधीसाठी प्रयत्न करू असे सुचित केले.

5) पुढील वर्षीच्या विकास कार्याचे नियोजन करणे:- यामध्ये पुढील कार्यक्रम घेण्याविषयी चर्चा झाली.

1) महाविद्यालय व अमरदीप बालविकास फाउंडेशन मार्फत अंगणवाडी सेविकांसाठी (pre-primary शिक्षक) परिसंवाद आयोजित करणे.

2) जुलै 2025 मध्ये आयसीटी अंतर्गत सहा महिन्याचा आर्टिफिशियल इंटेलिजन्स हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करणे. जे विद्यार्थी swayam चा एक कोर्स पूर्ण करतील असेच विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र असतील असे माननीय प्राचार्यांनी सुचित केले .

3) इयत्ता पाचवी व आठवी या इयत्तांना स्कॉलरशिप शिकवणाऱ्या शिक्षकांच्यासाठी (Teacher training) एक दिवसीय प्रशिक्षण शिबिर आयोजित करणे

4) MPSC, UPSC या स्पर्धा परीक्षांच्या मुलाखतीसाठी एक दिवसीय प्रशिक्षण शिबीर आयोजित करणे

5) FY.B.Ed. Sem 2 मधील विद्यार्थ्यांसाठी महिन्यातून एक दिवस एक तास व्यक्तिमत्व विकास यासाठी महावीर इंटरनॅशनल चे अध्यक्ष मा. सपन कुमार बर्धन सर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करणे.

6) आनंददायी शिक्षणाचा एक कार्यक्रम आयोजित करणे.

7) ICSSR अंतर्गत Artificial intelligence या विषयाला अनुसरून Role of Artificial intelligence in Education या विषयावर नॅशनल वर्कशॉप घेणे.

9) 23 डिसेंबर 2025 रोजी नॅशनल सेमिनार घेण्याचे ठरले. त्याचा विषय चर्चा करून नंतर सूचित केला जाईल असे मा. प्राचार्यांनी सांगितले.

ऐन वेळचे विषय :- यामध्ये विद्यार्थी स्कॉलरशिप, posh Act, शैक्षणिक वर्ष 2023- 24 मधील AQAR मधील रिक्त गेलेल्या मुद्द्यांविषयी दिनांक 29 /4 /2025 रोजी चर्चा घ्यावी इत्यादी बाबत चर्चा झाली.

महावीर इंटरनॅशनल संस्थेचे माजी अध्यक्ष माननीय सपन कुमार बर्धन यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर पर्यावरण विषयक कार्याबद्दल मिळालेला पुरस्कार तसेच शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल या महाविद्यालयाचे या कार्यासाठीचे योगदान( कपडे की थैली मेरी सहेली) दिल्याबद्दल आंतरराष्ट्रीय मॅगझीन मध्ये घेण्यात आलेली दखल

तसेच अमरदीप बाल विकास संस्थेचे अध्यक्ष माननीय एन डी खान सर यांचे महाविद्यालय विकास कार्यातील योगदान यासाठी या दोन सन्माननीय सदस्यां साठी मा. डॉ. रमा भोसले मॅडम यांनी अभिनंदनचा ठराव मांडला.

ठराव – मा. श्री. सपन कुमार बर्धन व मा. श्री. एन. डी खान यांचे अभिनंदन

अनुमोदन - डॉ. प्रियंका सुभेदार

सभेच्या शेवटी डॉ. प्रियंका सुभेदार यांनी मा. सपन कुमार बर्धन, श्री. एन. डी. खान, श्री. संदीप वाघ या उपस्थित समिती सदस्यांचे, तसेच मा. प्राचार्य व प्राध्यापकांचे आभार मानून मा. प्राचार्यांच्या अनुमतीने सदर सभा संपन्न झाल्याचे जाहीर केले.